(राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/जिपर्पस-२०२५/प्र.क्र.२९/का.७, दि. ०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-९ (ब)

## पंचायत समिती प्रारुप आरक्षणाबाबतची अधिसूचना

क्रमांक2025/सा.प्र./जिपपसंनि/प्र.क्र.16 ज्याअर्थी; राज्य शासनाकडील क्रमांक जिपनि-2025/प्र.क्र.36/पंरा.2, दि.12/06/2025 व दि.18/06/2025 रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार **सोनपेठ पंचायत समिती** च्याआगामी सार्वत्रिक निवडणुकी करिता **06** निर्वाचक गणांच्या भौगोलिक सिमा क्र.2025/सा.प्र./जिपपसंनि/प्र.क्र.2 दिनांक 22 ऑगष्ट, 2025, च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील क्रमांक रानिआ/जिपपंसनि-2025/प्र.क्र.29,का-7 दिनांक 01/10/2025 च्या आदेशान्वये **सोनपेठ** पंचायत समितीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रीयांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाकडील क्रमांक रानिआ/जिपपंसनि-2025/प्र.क्र.29,का-7 दिनांक 01/10/2025 च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची सोडतीद्वारे काढण्यात आलेल्या आरक्षणाचे प्रारूप प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार **सोनपेठ** पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत दि.13/10/2025 रोजी काढण्यात आली. सदर सोडतीनंतर निश्चित झालेले निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे;

आणि त्याअर्थी, सदर प्रारुप आरक्षणाची अधिसूचना **सोनपेठ पंचायत समिती** क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून सूचना देण्यात येत आहेत की, सदर प्रारुप आरक्षण अधिसूचनेस, ज्या लोकांच्या काही हरकती असतील, त्यांनी त्या जिल्हाधिकारी कार्यालय परभणी / तहसिल कार्यालय सोनपेठ यांच्याकडे दिनांक 17.10.2025 पर्यंत सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही.

### सोनपेठ पंचायत समितीमधील एकूण जागांचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 01 | 01 |
| 2. | अनुसूचित जमाती | 00 | 00 |
| 3. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | 01 | 01 |
| 4. | सर्वसाधारण | 04 | 01 |
| | एकूण | 06 | 03 |

Scanned with OKEN Scanner

सोनपेठ पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभाग क्रमांक व नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1. | सोनपेठ | 35-शेळगाव मराठा | 69-शेळगाव मराठा | सर्वसाधारण |
| 2. | | | 70-शिर्शी बु. | ना.मा.प्र. (स्त्री) |
| 3. | | 36-नरवाडी | 71-नरवाडी | सर्वसाधारण |
| 4. | | | 72-वडगांव | सर्वसाधारण |
| 5. | | 37-उखळी बु. | 73-उखळी बु. | अनुसूचित जाती (स्त्री) |
| 6. | | | 74-डिघोळ ई | सर्वसाधारण (स्त्री) |

दिनांक 13.10.2025

ठिकाण तहसिल कार्यालय सोनपेठ

सुनिल कावरखे
तहसिलदार सोनपेठ

श्रीमती अरुणा संगेवार
उपजिल्हाधिकारी निवडणूक
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

संजयसिह चव्हाण (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी परभणी

Scanned with OKEN Scanner